जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police


**प्रेसनोट क्रमांक - ३०२ दिनांक - ०१/०५/२०२१**

. **समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर**

## ७२ तासाच्या आत तडीपार गुन्हेगाराकडून मंदिरातील चोरीचा गुन्हा समर्थ पोलीस ठाणेकडील तपास पथकाने केला उघड

समर्थ पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक विशाल मोहिते, व तपास पथकातील स्टाफ हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस शिपाई हेमंत पेरणे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, खडक पोलिस स्टेशन कडील तडीपार सराईत गुन्हेगार नामे विनायक कराळे हा समर्थ पोलिस स्टेशन हद्दीत उतारा चौक, रास्ता पेठ, पुणे येथे सार्वजनिक रोडच्या कडेला उभा आहे. लागलीच त्यांनी ही बातमी वरिष्ठांना सांगितली. तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक विशाल मोहिते यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार बातमीची खात्री करून कायदेशीर कारवाई करणे कामी पोलीस शिपाई हेमंत पेरणे, पोलीस शिपाई शाम सुर्यवंशी, बिट मार्शल पोलीस शिपाई योगेश केंजळे, पोलीस शिपाई मारुती कुंजीर या कर्मचारी यांना सोबत घेवून उतारा चौक रास्ता पेठ पुणे या ठिकाणी रवाना झाले. सदर बातमीनुसार तडीपार आरोपी विनायक कराळे याचा कसोशीने शोध घेतला. पोलीसांना बघून विनायक कराळे पळुन जावू लागल्याने स्टाफच्या मदतीने पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्याचे नांव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव – विनायक बंडु कराळे, वय २२ वर्षे ,रा. साईबाबा मंदीरा समोर काशेवाडी, भवानी पेठ, पुणे असे असलेचे सांगीतले. सदर इसमावर मा. पोलीस उपआयुक्त साो, परि. १, पुणे शहर यांचे आदेश नुसार ०२ वर्षाकरीता पुणे पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातून तडीपार केलेले आहे. आरोपीला समर्थ पोलिस स्टेशन येथे आणले व त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे विचारपूस केली असता त्याने समर्थ पोलिस स्टेशन हद्दीतून सुमारे तिन दिवसापूर्वी त्याने नवावाडा, नानापेठ, पुणे येथे शितळादेवी मंदीराचे लॉक तोडुन मुर्तीवरचे २ चांदिचे मुकुट चोरून घरफोडी केली असलेचे सांगीतले. समर्थ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७८/२०२१ भादविक. ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीवर यापुर्वी चोरी, घरफोडी व इतर एकूण ०८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही मा. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे शहर, मा. डॉ. प्रियंका नारनवरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ पुणे शहर, मा. श्री. सतिश गोवेकर सहाय्यक पोलीस आयुंक्त, फरासखाना विभाग, पुणे श्री. विष्णु ताम्हाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, समर्थ पो.स्टे, उल्हास कदम, पोलीस निरीक्षक, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक विशाल मोहिते, व कर्मचारी पोलीस हवालदार संतोष काळे, सुशील लोणकर, सुभाष पिंगळे, पोलीस शिपाई हेमंत पेरणे, शाम सुर्यवंशी, सचिन पवार, सुमित खुट्टे, निलेश साबळे, सुभाष मोरे, विठ्ठल चोरमले, यांनी केली आहे. पुढील तपास सहा. पो. नि. खोपडे हे करित आहेत.

.